**प्रेसनोट**

ला.प्र.वि,वाशिम.

दि.२२/०७/२०२६

आरोपी लोकसेवक हेमंतकुमार दगाजी चव्हाण, वय ५६ वर्षे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम) वाशिम यांनी तक्रारदार यांना प्लॉट वाटप करण्याचे शिफारसपत्र मा.जिल्हा पुनर्वसन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केल्याचा मोबदला म्हणुन ३०,०००/—रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/— रु ची लाच मागणी केली. दि.२२.०७.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक हेमंतकुमार दगाजी चव्हाण यांनी तक्रारदार यांचे कडुन ५०००/— रुपये लाच रक्कम स्विकारली. त्यांना लाच स्विकारले प्रकरणात ताब्यात घेण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | आरोपी लोकसेवक हेमंतकुमार दगाजी चव्हाण, वय ५६ वर्षे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम) वाशिम रा.प्लॉट नंबर ६०२ पंढरीनाथ कॉम्प्लेक्स एन.डी.ए. रोड शिवने पुणे |
| लाच स्विकारल्याची रक्कम | ५,०००/— रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना प्लॉट वाटप करण्याचे शिफारसपत्र मा.जिल्हा पुनर्वसन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केल्याचा मोबदला म्हणुन पडताळणी कारवाई दरम्यान ३०,०००/—रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/— रु ची लाच मागणी केली. सापळा कारवाई दरम्यान ५,०००रु स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | श्री.सुलभा राउत,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

गुन्हयाची हकीकत अशाप्रकारे आहे की, दि.२२/०७/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वाशिम येथे हजर येवुन गैरअर्जदार हेमंतकुमार दगाजी चव्हाण, वय ५६ वर्षे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम) वाशिम हे त्यांना प्लॉट वाटप करण्याचे शिफारसपत्र मा.जिल्हा पुनर्वसन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केल्याचा मोबदला म्हणुन ३०,०००/—रू लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रार दिली.

सदर तक्रारीची शासकीय पंचासमक्ष पडताळणी दि.२२/०७/२०२६ रोजी केली असता कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना प्लॉट वाटप करण्याचे शिफारसपत्र मा.जिल्हा पुनर्वसन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केल्याचा मोबदला म्हणुन आलोसे हेमंतकुमार दगाजी चव्हाण, वय ५६ वर्षे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम) वाशिम यांनी ३०,०००/—रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/— रु ची लाच मागणी केली व त्याच दिवशी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.२२/०७/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे यांनी मागणी केलेल्या २०,०००/— रुपयांच्या अनुषंगाने, तक्रारदार यांना पैशाची अडचण असल्यामुळे ५,०००/— रुपये हजर केले. सापळा कारवाई दरम्यान आलोसे हेमंतकुमार दगाजी चव्हाण, वय ५६ वर्षे, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम) वाशिम यांनी तक्रारदार यांचे कडुन ५,०००/—रु. लाच रक्कम स्विकारली व उर्वरीत रक्कमेची देखील मागणी केली.यावरून आलोसे हेमंतकुमार दगाजी चव्हाण यांना सदर गुन्हयात ताब्यात घेण्यात आले. आलोसे यांचे कडुन लाच रक्कम ५,०००/— रु हस्तगत केली. आरोपी लोकसेवक हेमंतकुमार दगाजी चव्हाण यांचे हे कृत्य कलम ७(b) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे होत असल्याने आलोसे यांचे विरुध्द पो.स्टे.वाशिम (शहर), जि. वाशिम येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही **मा.पोलीस अधिक्षक, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिंद्र शिंदे, अॅन्टीकरप्शन ब्युरो अमरावती,** यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदिश परदेशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. तपास अधिकारी श्रीमती सुलभा राउत पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.वाशिम यांचे पथकातील कर्मचारी पोहवा आसिफ शेख, विनोद मारंकडे, अमोल काळमुंदळे,पो.कॉ महेश परमेश्वरे, ला.प्र.वि.वाशिम व चापोहवा मिलींद चन्नकेशला.मो.प.विभाग वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टीकरप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनीक्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक—७५०७०५५२०५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जगदीश परदेशी,पोलीस उपअधिक्षक अॅन्टीकरप्शन ब्युरो, वाशिम यांनी केले आहे.

(जगदीश परदेशी)
पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.